मराठी (प्रश्न-पत्र–II)

(साहित्य)

वेळ : तीन तास | कमाल अंक : 250

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नाच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तराती काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

MARATHI (PAPER—II)

(LITERATURE)

Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

SECTION—A

1. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादकपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) ...सरकारी गोरे अधिकारी हे बहुतेक करुन ऐषआरामात गुंग असल्यामुळें त्यांना शेतकऱ्यांचे वास्तविक स्थितीबद्दल माहिती करून घेण्यापुरती सवड होत नाही व या त्यांच्या गाफीलपणानें एकंदर सर्व सरकारी खात्यांत ब्राम्हण कामगारांचे प्राबल्य असतें, या दोन्ही कारणांमुळे शेतकरी लोक इतके लुटले जातात की, त्यांस पोटभर भाकर व अंगभर वस्त्रही मिळत नाही...

(b) एक वेळ भटोबासांसी तृषा लागली : तें एकाते म्हणीतलें : मज पाणी पाजा गा : तंवं तेहीं भिल्लरीचे उदक गाळुनी आणीलें : आणि भटोबासांसी संपादीले : ते भट पीयाले : भग म्हणीतलें : भटो तुम्हां बोडिगंगा समान सांधितीली असें कीं : भटोबासी म्हणीतलें : ते आपणयांसी समान होआवी : पुढीलासी संपादीतां बोडि ले बोडि : आणि गंगा ते गंगा : ऐसी बुधि हुआवी की : तथा भावेंहीन तें दैवंहीन म्हणणें.

(c) स्त्रीने विवाहपद्धतीचा व पुरुषांकितेचा स्वीकार करून आपल्या पोषणाची आणि आपल्या अपत्यांच्या पोषणाची जबाबदारी पुरुषावर ढकलावी ही गोष्ट बहुजनसाध्य असल्यामुळे या रीतीचाच अवलंब जगभर झाला. आणि ही संस्था यशस्वी करण्यासाठी पातिव्रत्याचे महत्त्व सर्व कवी वर्णू लागले व पुरुषाचा अधिकार पक्का होण्यासाठी कायदे होऊ लागले.

(d) मी बी.ए. परीक्षेत पांच वेळा नापास झालो! कां झालो याचे कारण ठाऊक आहे? आमचे स्टार्सच असे भिकार की, प्रत्येकवेळी परीक्षेत नेमका असा नंबर यायचा की, त्याच्या आकड्यांची बेरीज हटकून नऊ व्हायची. पहिल्या परीक्षेस सुरुवात नऊ तारखेला होती, तर शेवटल्या खेपेला परीक्षेचा निकाला नऊ तार खेला होता.

(e) आम्ही दोघेही तसच त्या भाकरी व जी असेल ती भाजी खातासू. येवढं मात्र खरं की धर्माला चोरून त्याला चांगली भाकर ठेवून कचकच लागणारी मी खाऊन टाकायचो कारण मला वाटायचं की धर्मा हा गुरुमायीचा पोरगा व आपण एक परदिसा व ह्या धर्माच्या नावानं येवढं तरी मिळतं तेही काही न करता मग किती चांगल है हे सगळं वाटायचं.

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचे चित्र 'स्मृतिस्यळा'तून कसे साकार झाले आहे, त्यासंदर्भातील मत साधार स्पष्ट करा. 15

(b) महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये त्या काळातल्या शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे वर्णन केले आहे. या विधानाचा परामर्श घ्या. 15

(c) 'आठवणींचे पक्षी' मधील जीवनानुभव सामान्यपासून तत्त्वशोधन करणाऱ्यांपर्यंत सर्वांना अन्तर्मुख करणारे आहेत, हा देखलि ह्या छोट्या ग्रंथातील एक महत्त्वचा विशेष होय, या विधानाची साधार चर्चा करा. 20

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'एकेक पान गळावया' या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना स्त्री-पुरुष नातेसंबंधांभोवतीच फिरते. साधार स्पष्ट करा. 15

(b) शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी 'बिशू' च्या माध्यमा द्वारे सामर्थ्यशाली प्रवृत्ती असलेल्या एका व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा आलेख रेखाटला आहे, या विधानाच्या संदर्भात साधार उहापोह करा. 15

(c) बाबूराव बागूल हे दलित जीवनाचे प्रभावी भाष्यकार होते, या विधानाची 'जेव्हा मी जात चोरली होती' या संग्रहाच्या आधारे चिकित्सा करा. 20

Optional Province · optionalprovince.com

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''मानवी प्रेरणा, पुरुषसत्ताक समाजव्यवस्था आणि स्त्रीचे निवडस्वातंत्र्य याविषयीची ठाम भूमिका केतकरांच्या 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीत गृहीत धरेलेली दिसते.'' साधार स्पष्ट करा. 15

(b) 'साष्टांग नमस्कार' या नाट्यकृती द्वारे आचार्य अत्रे यांनी मानवी स्वभावातील विसंगतीचे दर्शन कसे घडविले आहे. साधार स्पष्ट करा. 15

(c) उद्धव शेळके यांच्या लेखनातील जीवनानुभव मर्यादित स्वरूपाचे आहेत असे तुम्हाला वाटते का? 'शिळान' कथासंग्रहाच्या आधारे चर्चा करा. 20

SECTION—B

5. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादकपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a)
सुंदरा मनामधिं भरलि जरा नाहि ठरली
हवेलिंत शिरली मोत्याचा भांग।
रे गड्या हौस नाहिं पुरलि म्हणोनी विरली
पुन्हा नाहिं फिरलि कुणाची सांग॥

(b)
प्रकट तिजपुढारी जाहला राजमौळी
पदर बरि न घेतां हार तैसा झळाळी
निजहृदयनिवासी काय बाहेरि आला
निरखुनि दमयंती तेंवि मानी तयाला

(c)
परी भव्य ते तेज पाहून पूजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे!

(d)
जाड परोठ्यान झालो म्हणा षंढ
आता कैवे बंड इहलोकी...
अनंताचे म्हणा फळो आले ज्ञान
परी रोटीवीण व्यर्थ बाप्पा
संपलाच नाही भाकरीचा मार्ग
ग्रंथातले स्वर्ग कशापायी?

(e)
नको मोजू माझ्या मुक्तीची अंतरे,
ब्रह्मांडाची दारे बंद झाली
माझ्या आसवांना फुटे हिमगंध,
मागे पुढे बंध पापण्यांचे

Optional Province · optionalprovince.com

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''अंतर्मुखता, आत्मपरता आणि जिव्हाळा हा नामदेवांच्या कवितेचा गाभा आहे.'' चर्चा करा. 15

(b) 'दमयंती-स्वयंवर' या काव्याच्या आधारे रघुनाथपंडितांच्या काव्यगुणां विष्काराचा परामर्श घ्या. 15

(c) शाहिरी वाङ्मयाला 'मराठी काव्याची प्रभात' असे कोणी म्हटले ते सांगून पैंजण या संग्रहाच्या आधारे अशा संबोधनाच्या सार्थकतेविषयीची चर्चा करा. 20

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'एक निसर्गकवी' म्हणून बालकवींच्या काव्याविष्कारांविषयीचा परामर्श घ्या. 15

(b) 'संध्याकाळच्या कविता' या संग्रहाच्या आधारे ग्रेस यांच्या प्रतिमासृष्टीवर बेतलेले सार्थक टिपण लिहा. 15

(c) ''स्वातंत्र्याबद्दलची कमालीची आसक्ती, पारतंत्र्याबद्दलचा कमालीचा संताप याबरोबरच अन्याय, जुलुम, विषमता यांच्याविरुद्धचा आक्रोश हा 'विशाखा' या संग्रहाचा मुख्य आशयप्रदेश आहे.'' या विधानाची सत्यता पटवून द्या. 20

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) '' 'जाहीरनामा संग्रहातील' कविता श्रमिकांच्या जीवनानुभवांचे विविध पदर उलगडून दाखवते.'' साधार चर्चा करा. 15

(b) ''सामाजिकतेच्या पलिकडे जाऊन मानवी अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न नामदेव ढसाक यांची कविता करते.'' 'या सत्तेत जीव रमत नाही'च्या आधारे हे विधान स्पष्ट करा. 15

(c) 'मृदगंध' मधील प्रतिमासृष्टीची वैशिष्ट्ये अधोरेखित करा. 20

★ ★ ★

Optional Province · optionalprovince.com